## ७. गवताचे पाते वि. स. खांडेकर

हिवाळा नुकताच सुरू झालेला होता. झाडावरून एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली. पट...पट...पट... त्यांचा तो पट...पट...असा कर्णकटू आवाज... तो आवाज ऐकून धरतीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले. गिररक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले, ‘‘पडता पडता किती कटकट करतोयस तू? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की!’’ पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, ‘‘अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार? हा दंगा नाही, बेटा! हे गाणं चाललंय! जन्मात कधी आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजायचं नाही!’’ हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले. ते पुन्हा जागे झाले, ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने! त्या स्पर्शात जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरतीमातेच्या कुशीत लपू लागले-झोपू लागले. पण पुन:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती...पट पट असा आवाज करीत पृथ्वीवर पडत होती! ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, ‘काय ही हिवाळयातली पानं! जीव खाऊन टाकला यांनी अगदी! केवढा हा कर्णकटू आवाज...छी छी छी! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी!’

(१) वैशिष्ट्ये लिहा.

(i) वसंतऋतूचा स्पर्श

--------- -------

(ii) खालील वाक्यांच्या साहाय्याने गवताचे पाते आणि पिकलेले पान यांच्या वृत्तीतील फरक स्पष्ट करा व तक्ता पूर्ण करा.

(अ) गोड स्वप्न बघणारे

(आ) स्वत:ला रसिक समजणारे

(इ) कर्णकटू आवाज सहन न होणारे

(ई) स्वत:ला उच्चपदस्थ समजणारे

| गवताचे पाते | पिकलेले पान |
|---|---|
| (i) ------------------- | (i) --------------------- |
| (ii) ----------------- | (ii) -------------------- |

(२) (i)चौकट पूर्ण करा.

गवताच्या पात्याचे स्वभाव विशेष

------- ------- ------ ------

(ii) कोण ते लिहा.

अ) गिरक्या खात जमिनीवर येणारे –

आ) धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले -

(३) पुढील शब्दांचे प्रमाणशब्द कथेतून शोधून लिहा.

अ) वसुंधरा -------------------- आ) पर्ण -------------

इ) रव ------------------- ई) तृण - -------------

(४) **स्वमत-** (i) गवताच्या पात्यासारखा स्वभाव असणाऱ्या व्यक्तिबद्दल तुमचे मत लिहा.

(ii) कोणालाही क्षुद्र लेखणे, तुच्छ समजणे तुम्हाला योग्य वाटते का?

**संपूर्ण पाठावर आधारित प्रश्न :**

1) **वाक्य पूर्ण करा.**

   1) झाडावरुन पिकलेली पाने गळून पडू लागली जेव्हा...

   2) झोपी गेलेले एक गवताचे पाते जागे झाले जेव्हा...

   3) धरणीमातेच्या कुशीत झोपलेले ते पान पुन्हा जागे झाले जेव्हा...

2) **कोण ते लिहा.**

   1) गिरक्या खात जमिनीवर येणारे –

   2) धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले –

   3) चिडखोर बिब्बा –

   4) संजीवक स्पर्श असणारा –

   5) कर्णकटू आवाज करणारी –

**कारणे लिहा.**

1) झाडावरुन एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली, कारण ...

2) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्याने गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली कारण ...

3) पान गवताच्या पात्याला अरसिक म्हणाले, कारण ...

4) वसंताच्या संजीवक स्पर्शाने गवताचे पाते जागे झाले कारण ...